# महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित

नोंदणीकृत कार्यालय : सी.डी.ओ. हटमेंटस्, एल.आय.सी. (योगक्षेम) बिल्डींग समोर,
मादाम कामा रोड, मुंबई – 400 020.
दूरध्वनी : 022-22845678 फॅक्स : 022-2285 2182.

## :जाहीर लिलाव:

क्र.मपविम/साक्री/वाशी/साहित्य/लिलाव/अ-01-VI/2017.
दिनांक – 25/04/2017.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सेक्टर – 10 अ, वाशी, नवी मुंबई येथील जलक्रिडा केंद्राच्या ठिकाणी असलेले जलक्रिडा साहित्य **"जसे आहे त्या स्थितीत"** दि.28/04/2017 रोजी वेळ 11.30 वा खुल्या बोलीने महामंडळामार्फत खालील साहित्याचा लिलाव करण्यात आहे. तरी, इच्छुक साहित्य खरेदी धारकास महामंडळ आमंत्रित करीत आहे.

| **अ.क्र.** | **साहित्य** | **नग** |
|---|---|---|
| 1 | Mini Generator Set | 2 |
| 2 | Fire Fighting Gas Cylinders | 4 |
| 3 | Floating Balls (Buoys) | 31 |
| 4 | Paddle Boats | 10 |
| 5 | Boat Canopy | 4 |
| 6 | A/C (IDU) | 1 |
| 7 | Floating Jetty | 1 |

इच्छुक खरेदीधारकास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून लिलाव प्रक्रियेत भाग घेता येईल.

**अटी व शर्ती -**

1) वरील लिलावाच्या स्थळी किमान 1 तास अगोदर लिलावामध्ये भाग घेण्यासाठी रु. 10,000/- रोख अनामत रक्कम महामंडळाच्या समितीकडे जमा करावी लागेल. ही रक्कम लिलावाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित भाग घेणाऱ्या बोलीधारकास परत करण्यात येईल.
2) वर नमूद केलेल्या साहित्याचे पहिल्या स्तरावर एकत्रित लिलाव बोलीद्वारे करण्यात येईल. सदर लिलावास प्रतिसाद लाभला नाही, तर प्रत्येक साहित्याचा लिलाव बोलीद्वारे करण्यात येईल.
3) साहित्याचा एकत्रित अथवा प्रत्येकी सर्वाधिक किंमत देणाऱ्यास, सदरच्या वस्तू संपूर्ण खरेदी रक्कम अथवा सर्वाधीक बोलीची किमान 50% रक्कम सर्व करांसह लिलावाच्या ठिकाणी उपस्थितीत महामंडळाच्या समितीकडे जमा करणे बंधनकारक आहे. तसेच बोलीधारकाने साहित्याची संपूर्ण बोली रक्कम महामंडळाकडे जमा भरल्याखेरीज वस्तूचा ताबा दिला जाणार

नाही.

4) बोलीधारकाने उच्चतम रक्कम लिलावाच्या दिनांकापासून 1 दिवसाच्या आत महामंडळाकडे जमा करणे बंधनकारक राहील.

5) महामंडळाने स्वीकृत केलेल्या बोलीधारकास वस्तूची संपूर्ण रक्कम महामंडळाकडे जमा केल्यानंतर 1 दिवसात स्वतःच्या जबाबदारीवर जागेवरून वस्तू घेऊन जाणे बंधनकारक राहील.

6) 1 दिवसात बोलीधारकाने वस्तू जागेवरून उचलून न नेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित स्वीकृत केलेल्या बोलीधारकाची राहील.

7) जर बोलीधारकाने वस्तू जागेवरुन वरील कालावधीत उचलून न नेल्यास सदरील साहित्याचा पुन:श्च जाहिरात देवून लिवाव करण्यात येईल व बोलीधारकाने महामंडळाकडे जमा केलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

**8) लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यापूर्वी खरेदीदाराने वरील अटी व शर्ती मान्य असल्याचे लेखी स्वरुपात लिलावाच्या ठिकाणी उपस्थितीत महामंडळाच्या समितीकडे पत्र देणे बंधनकारक आहे.**

सही/-
व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.